जा.क्र.प्रा.ना.सं.कें./आस्था/460/२०२०
प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र,भाटये
दिनांक : १०/०७/२०२०

प्रति,

.........................................

.........................................

**विषय :– जेवणाचे दरपत्रक पुरविणेबाबत..........**

महाशय,

उपरोक्त विषयास अनुसरून कळविणेत येते की, प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाटये येथे विस्तार कार्यक्रम राबविले जातात सदर प्रशिक्षणामध्ये सहभागी शेतकरी, मा. मान्यवर, विस्तार कार्यकर्ते, उदयोजक यांना अल्पोपहार व जेवण देण्यासाठी कृपया खालील तपशीलाप्रमाणे आपली दरपत्रके या कार्यालयाला बंद **लखोटयातून/कुरिअरने दिनांक १६/०७/२०२०** पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहचतील अशी देण्यात यावीत. बंद लिफाफ्यावर अल्पोपहार व जेवणाचे दरपत्रक असा उल्लेख करावा.

| अ.क्र. | तपशिल | दर | शेरा |
|---|---|---|---|
| १) | **चहा – प्रत्येकी १०० मिली ( साधा )** | | सदरचा चहा नाश्ता आपण स्वत: सेवा देऊन पुरवायचा आहे. |
| | **चहा ( स्पेशल) – प्रत्येकी १०० मिली** (दुधाचा ) | | |
| | **कॉफी – प्रत्येकी १०० मिली** | | |
| २) | **नाश्ता – प्लेट**<br>पोहे /उपमा/शिरा ( प्रत्येकी १५० ग्रॅम ) वरिल पैकी १ वनज ( प्रत्येकी १५० ग्रॅम ) | | |
| ३) | **जेवण शाकाहारी**<br>१ वाटी सुकी भाजी, १ वाटी पातळ भाजी ( प्रत्येकी १०० ग्रॅम भाजी ) ३ चपाती, भात (प्रत्येकी १५० ग्रॅम), डाळ ( घट्ट १५० मिली), पापड ( प्रत्येकी १ नग ), लोणचे ( प्रत्येकी १५ ग्रॅम ) | | सदर जेवण आपण स्वत: सेवा देऊन दयावयाचे आहे. |
| | **जेवण शाकाहारी ( स्पेशल)**<br>१ वाटी सुकी भाजी, १ वाटी पातळ भाजी ( प्रत्येकी १०० ग्रॅम भाजी ) ४ चपाती, भात (प्रत्येकी १५० ग्रॅम), डाळ ( घट्ट १५० मिली), पापड ( प्रत्येकी १ नग ), लोणचे ( प्रत्येकी १५ ग्रॅम ), स्विट १ डिश, कोशिंबीर ५० ग्रॅम | | |

**सदरच्या दरांची वैधता दि. ३१/०३/२०२१ पर्यंत असेल.**

१) खादयपदार्थाची चव उत्तम दर्जाची असावी. नीटनीटकेपणा व साफसफाई असणे आवश्यक आहे.
२) खादयपदार्थात बिघाड झाल्यास देयके पारित केले जाणार नाहीत.
३) गुणवत्ता व दर्जा याबाबतची चाचणी करूनच जेवण पुरवावे लागेल.
४) दरपत्रकात GST चा उल्लेख असावा. छुपे कर असु नयेत. दर भाटये पोहोच असावेत तसेच अन्न व प्रशासन विभागाचा परवाना असल्यास सोबत जोडण्यात यावे
५) डाकघरद्वारे दरपत्रक मिळण्यास उशिर झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
६) कार्यालय कोणतेही कारण न देता आपल्या एकमेव स्वेच्छाधिकारावर हे दरपत्रक रद्द करण्याचा /मागे घेण्याचा/दुरूस्त करण्याचा किंवा नियंत तारीख वाढविण्याचा अधिकार राखून ठेवीत आहे.
७) आदेश प्राप्तीनंतर जर आपण जेवण/नाष्ता पुरविण्यास असमर्थ अथवा विलंब केल्यास आपणावर कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

आपला विश्वासू,

10/7

कृषिविद्यावेत्ता
प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र
भाटये, रत्नागिरी

प्रत: प्रसिध्दीसाठी रवाना

१) मा.संचालक विस्तार शिक्षण,डॉ.बा.सा.को.कृ.वि,दापोली. यांना विनंती करण्यात येते की वरील निविदा विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करून मिळावी.
२) मा.प्रमुख कृषि ज्ञान माहिती केंद्र akmudbkkv@gmail.com संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.
३) प्रा.ना. सं. के. भाटये (कार्यालयीन नोटीस बोर्ड)